# श्री रामचंद्र मिशन
# एकोज इंडिया

मे 2009 | खाजगी वितरणासाठी | खंड 2 अंक 3


नमस्कार

प्रिय बाबूजी महाराजांच्या जन्मोत्सव बडोदा आणि देशातील इतर केन्द्रांमध्ये साजरा केला गेला. या उत्सवामुळे देशभरातील अभ्यासींची अध्यात्मिक तृष्णा भागविली गेली असेल यात शंका नाही. पूज्य गुरुदेवांनी आपल्याला दिलेली नविनतम भेट –"व्हिस्पर्स फ्रॉम ब्राइटर वर्ल्ड– दुसरे प्रकटीकरण" हे या वर्षी प्रकाशित होणारे महत्वाचे पुस्तक आहे. हा ज्ञानाचा असा ठेवा आहे, ज्याबद्दल आपण विचार केला पाहिजे, त्याला आपल्या हृदयात अनुभवले पाहिजे आणि आपल्या आयुष्याशी एकरुप केले पाहिजे.

एकोज इंडियाच्या या अंकामध्ये पूज्य गुरुदेवांनी भारतातील अनेक शहरांमध्ये केलेला प्रवास, प्रशिक्षण कार्यक्रम, ओपन हाऊस सत्र व अनेक केन्द्रांवर झालेल्या मुल्याधारित अध्यात्मिक प्रशिक्षण कार्यक्रमांचा समावेश आहे. 'प्रकाशाची केन्द्रे' या भागात रायचूर आश्रमाचा समावेश केला आहे.

जुलै 2009 च्या अंकासाठी बातमीपत्रे स्वीकारण्याची शेवटची तारीख 15 जून 2009 आहे. कृपया बातमीपत्रे व छायाचित्रे आपल्या विभागप्रमुखांच्यामार्फत पाठवावीत.

प्रेमळ शुभेच्छांसह,
संपादकीय मंडळ



**वैश्विक प्रार्थना**

आपल्या मिशनमध्ये 9 वाजताची विश्वबंधुत्वाची प्रार्थना बऱ्याच अभ्यासींकडून दुर्लक्षिली जात आहे. ती महत्वाची आहे व अशयाप्रकारे दुर्लक्षिली जाऊ नये. ही एकत्रीकरणाची व हृदयांमध्ये ऐक्य निर्माण करणारी बाब आहे, जी कंपनपातळीवर असून अनुकूल असे सामुहीक मन; म्हणजेच साधना करणाऱ्या अभ्यासींमधील सुक्ष्म बंध, निर्माण करते. हे नित्यकर्म दुर्लक्षिले जाऊ नये ही अपेक्षा फार मोठी आहे का? सर्वांनी याबाबतीत जागृत होणे समजूतदारपणाचे ठरेल. विचारांचे आंतरीकरण व केंद्रीकरण करणारे हे काही क्षणच आपल्या मिशनसाठी उपयुक्त ठरतील – म्हणजेच आपल्या त्या सर्व बंधू आणि भगिनींसाठी ज्यांनी आपल्या दिव्य सद्गुरुंचे अनुसरण करण्याचा निश्चय केला आहे. जे समजूतदार आहेत त्यांनी सर्वांच्या भल्यासाठी हे लक्षात घेवोत.

## गुरुदेवांचा प्रवास

### कलकत्ता

जानेवारी व फेब्रुवारीच्या अत्यंत व्यग्र अशा उत्तर भारताच्या प्रवासानंतर 19 फेब्रुवारी रोजी पूज्य गुरुदेवांचे इंदोरहून, मुंबई मार्गे कलकत्ता येथे आगमन झाले. ते काहीसे थकलेले व आजारी वाटत होते. "डिव्हाइन ब्लिस" या बंधू अजय भट्टर यांच्या निवासस्थानी त्यांनी विश्रांती घेतली. दुसऱ्या दिवशी बहुतांश वेळ ते संगणकावर काम करत होते. या वयातही कित्येक तास काम करणाऱ्या गुरुदेवांना पाहून आश्चर्य वाटल्याशिवाय रहात नाही. 22 फेब्रुवारी रोजी गुरुदेव दुसऱ्या क्रेस्ट्च्या बांधकामाची पहाणी करण्यासाठी खरगपूर येथे गेले. (सेन्टर फॉर रिसर्च, साधना अँड ट्रेनिंग, पहिले केन्द्र बंगलोर येथे कार्यान्वित आहे). तेथे सत्संग करुन ते कलकत्त्याला आले व तेथुन चेन्नईसाठी रवाना झाले.






### चेन्नई

उत्तर भारताच्या मोठ्या दौऱ्यानंतर पूज्य गुरुदेव चेन्नई येथे राहिले. "व्हिस्पर्स फ्रॉम ब्राइटर वर्ल्ड– दुसरे प्रकटीकरण" हे पुस्तक 30 एप्रिल रोजी प्रकाशित केले जाणार आहे असे गुरुदेवांनी सतखोल येथे जाहीर केले होते. 1 मार्च रोजी त्याबद्दल बोलताना गुरुदेव म्हणाले, "ही पुस्तके म्हणजे सहजमार्गाची बायबल म्हणून ओळखली जातील. जर तुम्ही पहिल्या भागातले संदेश अत्यंत लक्षपूर्वक वाचले असतील तर त्यांचे वेगळेपण तुमच्या लक्षात आलेच असेल. त्यामुळे हे संदेश 'श्रुति' च्या योग्यतेचे आहेत. श्रुति म्हणजे केवळ ऐकीव किंवा कल्पनातीत किंवा बौद्धिक ज्ञान नाही. तसेच ज्याचे लिखाण मनुष्याने केले आहे असे ज्ञान नाही तर प्रकट केलेले ज्ञान आहे. पूज्य बाबूजी जरी मानव असले तरी ते देवत्वाला पोहोचलेले होते. म्हणूनच या पुस्तकासाठी द्याव्या लागणाऱ्या पैशांचा विचार करु नका.

अभ्यासींबरोबर अनौपचारीकपणे संवाद साधताना पूज्य गुरुदेवांची अस्वस्थता व त्यांच्या गुरुदेवांचे संदेश सर्वांपर्यंत पोहोचवण्याची तळमळ दिसून येत होती. एकही अभ्यासी या पुस्तकाच्या प्रतीपासुन वंचित राहू नये अशी त्यांची इच्छा आहे. यासाठी खर्च केलेला पैसा सत्कारणी लागेल असे ते म्हणाले. सत्संगापूर्वी अभ्यासींबरोबर संवाद साधण्याचा हा एक दुर्मीळ प्रसंग आहे असे गुरुदेव या प्रसंगी म्हणले.

### पुणे

पूज्य गुरुदेवांचे 12 मार्च रोजी विमानतळावर आगमन होताच अनेक अभ्यासी बंधु–भगिनींनी त्यांचे स्वागत केले. महाराष्ट्राच्या विविध केन्द्रांतून सुमारे 1700 अभ्यासी बन्धु–भगिनी पुढील काही दिवसात पानशेत येथील एस.एम.एस.एफ. रिट्रीट सेन्टर येथे जमले. 13 तारखेला गुरुदेवांनी सत्संगाचे संचलन केले व त्यानंतर भजनांचा कार्यक्रम झाला. 14 तारखेचा दिवस अभ्यासी बंधु–भगिनींनी ध्यान करण्यात, आपल्या अनुभवांची देवाण–घेवाण करण्यात व गुरुदेवांच्या भाषणांच्या सी.डी. व व्ही.सी.डी. बघण्यात व्यतीत केला. 15 तारखेला केलेल्या भाषणात पूज्य गुरुदेव म्हणाले, "मला अशी भीती वाटते आहे की आपले आश्रम सध्या अशा सम्मेलनांची ठिकाणे बनत चालली आहेत जिथे मित्रपरिवार व सहकाऱ्यांबरोबर गप्पा मारता येतात" . सहजमार्गाच्या साधनेला व अभ्यासाला कमीत–कमी वेळ दिला जात आहे. या भाषणानंतर गुरुदेवांनी लहान मुलांनी सादर केलेल्या कार्यक्रमाचा आनंद घेतला व सुमारे 2.30 च्या सुमारास ते तेथून निघाले या भेटीदरम्यान त्यांनी अनेक प्रशिक्षक नियुक्त केले आणि अनेक अभ्यासींच्या भेटी घेतल्या.







## पनवेल/ मुंबई





पूज्य गुरुदेवांचे 15 मार्च रोजी पनवेल येथे आगमन होताच पारंपारिक वेषातील छोट्या भगिनींनी त्यांचे स्वागत केले. मुंबई व आजुबाजूच्या केंद्रातून आलेल्या सुमारे 1000 अभ्यासींना त्यांनी थकलेले असुनही सिटींग दिले. सत्संगानंतर त्यांनी आश्रमाच्या गच्चीवर फेरफटका मारला आणि ग्रीन झोनच्या नयनरम्य दृष्याचा आस्वाद घेतला. रात्री पूर्ण चंद्र आकाशात असताना गुरुदेवांनी काही काळ अभ्यासींबरोबर व्यतीत केला.

दिनांक 16 मार्च रोजी पहाटे 5.45 च्या सुमारास गुरुदेव आश्रमाच्या गच्चीवर आले आणि त्यांनी अभ्यासींबरोबर कॉफी घेतली. सकाळी 9 च्या सत्संगानंतर काही भजने सादर केली गेली. दुपारच्या सुमारास गुरुदेवांनी ग्रीन झोनला भेट दिली व एका आंब्याच्या झाडाखाली काही काळ विश्राम केला. गुरुदेवांना सुलभतेने चालता यावे म्हणून एका बंधूने आंब्याच्या झाडाची फांदी वर उचलली, परंतु गुरुदेव म्हणाले,"तिला उचलू नका. ती नाजूक असते. आपण निसर्गासमोर आपला माथा अवनत करण्यास शिकले पाहिजे". स्त्रियांच्या दुरावस्थेबद्दल बोलताना ते म्हणाले, "स्त्रियांचे आयुष्य , विषेशतः भारतात, जन्मापासून ते मृत्यूपर्यंत दुःखाने भरलेले असते, कारण त्या परावलंबी असतात." ग्रीन झोनमधून परतताना गुरुदेवांनी मुलांच्या शिस्तीचे कौतुक केले व त्यांना चॉकलेट वाटले.

एका डॉक्टरांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना गुरुदेव म्हणाले "लक्षावधी पटीने उत्तम परिणाम मिळवण्यासाठी काम करताना सतत स्मरण केले पाहिजे." गुरुदेव म्हणले की 99.9% प्रश्न इच्छांमुळे उद्भवतात. याबद्दल सांगताना त्यांनी पूज्य बाबूजींनी एका अभ्यासीला दिलेल्या उत्तराकडे लक्ष वेधले. बाबूजी म्हणाले होते,"योग्य गोष्टी करण्यासाठी माझ्या परवानगीची गरज नाही आणि अयोग्य गोष्टींसाठी मी परवानगी देणार नाही".

रात्रीच्या जेवणानंतर गुरुदेवांनी गच्चीवर एक सिनेमा बघितला. अभ्यासींच्या उत्तम शिस्तपालनाचे बक्षीस म्हणून त्यांनी बराच काळ आपल्या कॉटेजच्या बाहेर व्यतीत केला. गुरुदेवांची ही एक शिकवणच होती– शिस्त व अनुशासन दर्शवलेत तर त्यांचे सान्नीध्य आणि जवळीक यांची हमीच!

## रायपूर



पूज्य गुरुदेवांचे 17 मार्च रोजी रायपूर, छत्तिसगड येथे आगमन झाले व जमलेल्या सुमारे 1200 अभ्यासींसाठी त्यांनी सत्संगाचे संचालन केले. या प्रसंगी बोलताना त्यांनी जागतीक शांतता, ऐक्य, शांततामय सहजीवन, सुसंवादी अस्तित्व याबद्दल आपले विचार मांडले. पूज्य बाबूजी महाराजांच्या मते, जोपर्यंत आपण 9 वाजताची वैश्विक प्रार्थना करत नाही तोपर्यंत मनुष्यजातीच्या एकीकरणाची काहीही आशा नाही.

18 तारखेच्या सकाळी पूज्य गुरुदेवांनी अमलेश्वर येथील नियोजित आश्रमाच्या (6.5 एकर) जागेला भेट दिली. तेथील ध्यान–कक्षाच्या पायाभरणी प्रसंगी बोलताना ते म्हणाले "सहजमार्गाच्या सर्व गुरुदेवांची दिव्य उपस्थिती मला याप्रसंगी जाणवत आहे. मिशनच्या अजून एका आश्रमाची स्थापना होत असताना, ते दृश्य पाहण्यासाठी हे सर्व गुरुदेव आपले प्रेम व आशीर्वादांसह उपस्थित आहेत."

दिनांक 19 रोजी सकाळी 9 वाजता सत्संग झाला. रायपूर येथील मुलांनी काही छोट्या गोष्टी विक्रीसाठी बनवल्या होत्या. त्यांच्या विक्रीतून आलेले पैसे व त्यांचे स्वतःचे काही पैसे एकत्र करुन आश्रमाच्या उभारणीसाठी गुरुदेवांना भेट देण्यात आले. अत्यंत आनंदाने ती भेट स्वीकारुन गुरुदेव म्हणाले की प्रौढांनीसुद्धा अनावश्यक खर्च कमी केल्यास त्या पैशांचा अधिक चांगल्या कामासाठी उपयोग होऊ शकेल. संध्याकाळचा सत्संग त्यांनी आपल्या रहाण्याच्या ठिकाणी केला व कलकत्त्यासाठी प्रयाण केले.

## कलकत्ता



20 मार्च रोजी पूज्य गुरुदेवांचे कलकत्त्यामध्ये आगमन झाले. ठरलेल्या वेळेच्या आधी ध्यान–कक्षात उपस्थित राहून त्यांनी सत्संगाचे संचालन केले. भावनेने ओथंबलेल्या स्वरात ते म्हणाले की अध्यात्मिकतेऐवजी भौतिक सुखासाठी लोक त्यांच्याकडे येत आहेत.

पूज्य बाबूजी गुरुदेवांना म्हणाले होते–"तुझ्यासारख्या लोकांची, संख्येने अत्यंत कमी असूनही, प्रगती होईल कारण तुमच्या हृदयात मी आहे. परंतु आपले इतर अभ्यासी बंधू माझी काहीही पर्वा करीत नाहीत. ते फक्त माझ्यापासून घेण्यासाठी येतात. त्यांना सर्वकाळ घेणे माहित आहे. त्यांनी योग्य प्रकारे ध्यान केले तर मी त्यांना संपूर्ण ब्रह्मांड देण्यास तयार आहे. केवळ एका सिटींगमध्ये मी हे करु शकेन. परंतु ही माणसे त्यांचे दुःख, त्यांचे आजार व त्यांचा माझ्या विरुद्धचा राग घेऊन माझ्याकडे येतात."

हा क्षण पूज्य बाबूजींकरिता अत्यंत निराशेचा होता. ब्राईटर वर्ल्डमध्ये आपल्या गुरुदेवांना कसे सामोरे जावे याची चिंता त्यांना सतावित होती. आध्यत्मिक नसलेल्या कित्येक विनंत्यांना नाकारण्याऐवजी, शिस्तबद्धतेऐवजी ते सर्व गोष्टींसाठी होकार देत आले होते. 23 मार्च रोजी गुरुदेवांनी चेन्नईसाठी प्रयाण केले.

श्री रामचंद्र मिशन
एकोज इंडिया



मे 2009 खाजगी वितरणासाठी खंड 2 अंक 3



## विशाखापट्टणम – आंध्रप्रदेश

25 मार्च रोजी पू. गुरुदेवांचे चेन्नईहून विशाखापट्टणम येथे आगमन झाले. सहा वर्षाच्या कालखंडानंतर ये या केंद्राला भेट देत होते. शांतपणे उभे राहून सुमारे 150 अभ्यासींनी गुरुदेवांचे विमानतळावर स्वागत केले. आश्रमाजवळच्या विश्रामगृहामध्ये गुरुदेवांनी दूपारचे भोजन केले व थोडी विश्रांती घेतली. 9.09 एकर जमीनीची त्यांनी यावेळी सहजमार्ग स्पिरिच्युएलीटी फाऊंडेशनच्या नावे नोंदणी केली. विशाखापट्टणमहून सुमारे 25 कि.मी. अंतरावर अभ्यासींसाठी वसाहत तयार करण्याची योजना आहे. आश्रमात जमलेल्या 3000 हून अधिक अभ्यासींसाठी गुरुदेवांनी दुपारी 4.30 वाजता सत्संगाचे संचालन केले. त्यानंतर एका छोटेखानी भाषणात त्यांनी पूज्य बाबूजींच्या एका संदेशाबाबत सांगितले. सहजमार्ग पद्धतीच्या पूर्णत्वाबद्दल बोलताना बाबूजी म्हणत असत की या पद्धतीत काहीही भर घालण्याची अथवा काढून टाकण्याची गरज नाही. अभ्यासी बंधू भगिनींनी जुन्यापूराण्या कर्मकांडातून स्वत:ला मुक्त करावे म्हणजे  सहजमार्ग त्यांच्यात आंतरबाह्य बदल घडवून आणू शकेल असे आग्रहाचे प्रतिपादन गुरुदेवांनी याप्रसंगी केले. शहरापासुन दूर असणाऱ्या एका फार्महाउसवर विश्राम करुन गुरुदेव 26 तारखेला सकाळी दहाच्या सुमारास चेन्नईला परतले.

त्रिची येथे 5 एप्रिल रोजी गुरुदेवांचे आगमन झाले. अनेक केंद्रांमधून आलेले सुमारे 300 अभ्यासी विमानतळावर गुरुदेवांची प्रतिक्षा करीत होते. सर्वांना पाहून आनंदलेले गुरुदेव जानकी फार्मकडे रवाना झाले. एका आठवड्याच्या तेथील मुक्कामानंतर 12 तारखेला सकाळी 7.30 वाजता गुरुदेवांनी त्रिची येथे सत्संगाचे संचालन केले व ते दिंडीगुलमार्गे तिरुपूरला जाण्यासाठी निघाले.

सकाळी 11 च्या सुमारास दिंडीगुल येथे एका अभ्यासी बंधूच्या घरी गुरुदेवांनी अर्ध्यातासाचा मुक्काम केला. दिंडीगुल, चिनालापट्टी आणि बाटलागुंडु येथील अभ्यासींनी गुरुदेवांचे प्रेमभराने स्वागत केले.

चिन्नालपट्टीच्या अभ्यासींना भेटून गुरुदेवांना विशेष आनंद वाटला. हे केंद्र त्यांनी स्वत: सुमारे 40 वर्षापूर्वी स्थापन केले होते. अलीकडच्या काळात या केंद्राचे पुनरुज्जीवन करण्यात आले आहे.

धरमपूर या ठिकाणी प्रतिक्षा करणाऱ्या सुमारे 125 अभ्यासींना भेटण्यासाठी गुरुदेव वाटेत काही काळ थांबले. काहीसे थकलेले व भुकेले गुरुदेव तिरुपूर येथे 1.30 वाजता पोहोचले. एका अभ्यासी बंधूने गुरुदेवांच्या रखरखीत ऊन्हातल्या मोठ्या प्रवासाबद्दल चिंता व्यक्त केली तेव्हा गुरुदेव म्हणाले "आपण आनंदी असतो तेव्हा भूक किंवा त्रासाचे काहिही वाटत नाही."

निरनिराळ्या केंद्रांतुन डायमंड ज्युबीली पार्क येथे आलेल्या 2500 अभ्यासींकरिता सोमवारी गुरुदेवांनी सत्संगाचे संचालन केले. तेथे जवळजवळ प्रत्येक दिवशी गुरुदेवांनी सत्संग केला.

बुधवार 15 एप्रिल रोजी उदुमालपेठ येथे गुरुदेवांनी प्रस्तावित ध्यानकक्षाचा शिलान्यास केला. गेल्या दोन दशकांपासून या गावात सहजमार्गाचा विकास होत आहे. एका अभ्यासी बंधूच्या प्रश्नाला ऊत्तर देतांना गुरुदेव म्हणाले की, टि.टि.के. समुहामध्ये काम करित असतांना ते या गावामध्ये अनेकदा आले होते.

ज्या गावांना गुरुदेव भेटी देतात त्याठिकाणी नवीन केंद्रे उभारली जातात व नवीन प्रशिक्षक नियुक्त होतात हे स्पष्टच आहे.

तिरुपूरमध्ये असतांना दोन भाषणे ध्वनिमुद्रित करण्यासाठी गुरुदेवांनी वेळ काढला. यावर्षी प्रकाशित केल्या जाणाऱ्या डि.व्ही.डी. संचामध्ये ही भाषणे असतील.

शनिवार, 18 एप्रिल रोजी सकाळी 10.30 वाजता गुरुदेव क्रिष्णगिरीला जाण्यास निघाले. ईरोड येथे दुपारचे जेवण घेऊन 4.30 च्या सुमारास ते क्रिष्णगिरीला पोहोचले. दुसऱ्या दिवशी ध्यानकक्षाचे उद्घाटन झाल्यानंतर त्यांनी उपस्थित सुमारे 800 अभ्यासींबरोबर संवाद साधला.





## बंगलोर

परमधाम आश्रम, बंगलोर येथे 19 एप्रिल रोजी पू. गुरुदेवांचे क्रिष्णगिरीहून आगमन झाले. हा आश्रम भरवस्तीत असल्याने बंगलोरच्या व त्याचप्रमाणे कर्नाटकातील इतर केंद्रांच्या अभ्यासींनी परमधाम आश्रमात कधी यावे याचे एक वेळापत्रक तयार करण्यात आले होते.

20 तारखेला पू. गुरुदेवांनी पाच विवाह संपन्न केले. याप्रसंगी ते अतिशय आनंदी दिसत होते व त्यांची तब्येतही उत्तम होती. तिरुपूरप्रमाणेच येथेही त्यांनी आपल्या भाषणांचे ध्वनिचित्रमुद्रण केले. परमधाम आश्रमातील सर्व खोल्यांना भेट देउन गुरुदेवांनी सर्वांना आश्चर्याचा सुखद धक्का दिला.






# श्री रामचंद्र मिशन
# एकोज इंडिया

मुख्यालयातील बातम्या

मे 2009 खाजगी वितरणासाठी खंड 2 अंक 3



## नवीन प्रकाशने

### ऋतवाणी (मराठी)





1981 साली मूळात इंग्रजित प्रकाशित झालेल्या (Voice Real) पुस्तकाचे हे मराठी अनुवादन आहे. या पुस्तकामध्ये मुख्यत: बाबूजी महाराजांच्या भाषण, लेखन व पत्रव्यवहाराचा संग्रह आहे. यामध्ये प्रिय रामचंद्रजींनी त्यांना समजलेले अध्यात्मिकतेचे मर्म जे त्यांनी त्यांच्या जवळच्या सहकाऱ्यांना व सर्वसामान्य जनतेला सांगितले होते त्याचा समावेश केला आहे.

### सहजमार्ग माहितीपत्रक




हे माहितीपत्रक अध्यात्मिकतेच्या इच्छुकांना सहजमार्ग पद्धतीच्या ध्यानाविषयी तसेच साधनेविषयी सुबोधतेने माहिती देते. सहजमार्गात प्रवेश करणाऱ्या सर्व इच्छुक व्यक्तिंना देण्यासाठी हे एक प्रमाणित व शिफारसपात्र असे माहितीपत्रक आहे. हे पत्रक सहजमार्ग साधनेच्या प्रमुख तत्वांसोबतच स्थानिक संपर्काविषयीची माहिती देते व सहजमार्गाविषयी माहिती देण्यासाठी आयोजिलेल्या सत्रात याचे वाटप करता येइल. अगोदरच इंग्रजीमध्ये प्रकाशित झालेले हे माहितीपत्रक मे 2009 मध्ये हिंदी, तामिळ, तेलुगु, कन्नड, बंगाली व आसामी भाषेमध्ये प्रकाशित होत आहे.

### सतत स्मरण (Constant Remembrance) एप्रिल 2009




या अंकात, 'आपण स्वत: बदलून आपले जग कसे बदलू शकतो' यावरील पू. गुरुदेवांचे भाषण, नातेसंबंधांवर बंधु पी. आर. कृष्णा यांचा लेख, कृतज्ञता याविषयावरील विभागाचा समावेश आहे. जगातील सहजमार्ग या विभागात, मध्यप्रदेशातील भोपाळ येथील आश्रमाचे उद्घाटन, व केरळमधील मलमपुझ्झा येथील रिट्रीट सेंटर यावर लेख आहेत.

## हिंदी भाषेतील अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रम

शाहजहाँपूर येथील आश्रमात प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यामध्ये साधना प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. प्रशिक्षण कार्यक्रम प्रत्येक मंगळवारी दुपारी 4 वाजता सुरु होऊन पुढील रविवारी दुपारी 12.30 वाजता संपन्न होतो.

पुढील कार्यक्रमाचे वेळापत्रक

1. 7 जुलै ते 12 जुलै 2009
2. 3 ऑगस्ट ते 9 ऑगस्ट 2009
3. 8 सप्टेंबर ते 13 सप्टेंबर 2009
4. 6 ऑक्टोंबर ते 11 ऑक्टोंबर 2009

अर्ज करण्यासाठी – प्रभात कुमार, पोस्ट बांकेगंज, जिल्हा लखिमपूर खेरी. (पिन – 262801)

ई–मेल – prabhatksrcm@gmail.com

## घोषणा

### प्रिय गुरुदेवांचा 83 वा वाढदिवस समारोह

जुलै 23 ते 25, 2009 तिरुप्पूर, भारत.

आशा व संधी असलेला कालखंड –

"....स्वत:ला या जन्मोत्सवासाठी तयार करा. ही गोष्ट माझ्या पुत्राला, अभ्यासी बंधू आणि भगिनींच्या हृदयात, वर्षागणीक याचे वाढत जाणारे महत्व दाखवून देईल. त्याच्यावर प्रेम केले जात आहे आणि त्याचे कार्य आमच्या अपेक्षेपेक्षा कितीतरी जास्त प्रमाणात फलद्रुप होत आहे. त्याच्या या पृथ्वीतलावरील जन्माचा भाग्यवान दिवस आपल्या मिशनच्या इतिहासात एक अविस्मरणीय घटना म्हणून कोरला जावा. तो मिशनला दैदिप्यमान बनवितो व विश्वासार्हता प्रदान करतो. हा देह धारण करुन या असामान्य व्यक्तिमत्वाच्या काळात तुम्ही जन्माला आला आहात याचा पून्हा एकदा आनंद माना..." –बाबूजी महाराज, व्हिस्पर्स फ्रॉम ब्राइटर वर्ल्ड

प्रिय गुरुदेवांनी त्यांचा 83 वा जन्मदिवस भारतातील तिरुप्पूर येथे साजरा करण्यासाठी दयाळूपणे परवानगी दिली त्याबद्दल आम्ही अत्यंत आभारी व आनंदित आहोत. या समारोहाचे निमंत्रण संस्थेच्या खालिल संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

http://www.srcm.org/members/24july2009/index.jsp

नोंदणीकरण (Registration), आराम निवास (Comfort Dormitory) यांसह समारोहाची ईत्यंभूत माहिती आंपण येथे मिळवू शकता. अभ्यासींना शक्यतो 15 जून 2009 च्या आधी नोंदणी करण्याची विनंती करण्यात येत आहे. इतर कुठल्याही माहितीसाठी समारोहाच्या आयोजकांशी 24july.helpdesk@srcm.org या पत्त्यावर संपर्क साधावा.

### एस.एम.आर.टी.आय चे कार्यकारी

सहजमार्ग अध्यात्मिक संस्थेची संशोधन व प्रशिक्षण शाखा म्हणून सहजमार्ग संशोधन व प्रशिक्षण संस्थान या संस्थेची स्थापना करण्यात आली. या संस्थेमध्ये खालिल व्यक्तिंची निर्देशित कार्यासाठी नेमणूक करण्यात आली आहे.

डॉ. के. एस. बालसुब्रमणियम – संचालक, संशोधन. (sanskritkannan@yahoo.com)
प्रशिक्षण साहित्य निर्मिती – ललीता श्रीनिवासन
शिष्यवृत्ती प्रशिक्षण – डॉली निकोलाय
प्रशिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम – एन. प्रकाश

एन. पद्मनाभन – संचालक, भारतीय कार्यक्षेत्र (padu@srcm.org)

युवक कार्यक्रम – एस. प्रकाश
बाल प्रशिक्षण कार्यक्रम – व्ही. मधुमती व ली रिच
अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रम – (नव परिचय) – कर्नल ए. रामकृष्णन
अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रम – (नियमीत) – अनुसुया रामचंद्रन
मुल्याधारित अध्यात्मिक शिक्षण – सीता कुंचितापदम व रंगराजू माधुरी
निबंध स्पर्धा – पूनित लालभाई, ललीता राजगोपाल व मिसल मेहता
शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम – लीझ किंग्जनॉर्थ

श्री रामचंद्र मिशन
एकोज इंडिया
झोनल एकत्रीकरण
मे 2009 खाजगी वितरणासाठी खंड 2 अंक 3







उत्तराखंड विभागातल्या शिक्षकवर्गाला प्रशिक्षण देण्यासाठी 15 ते 17 जानेवारी दरम्यान **सतखोल** केंद्रात 3 दिवसीय मूल्याधारित अध्यात्मिक प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सहभागी 40 अभ्यासींनी विविध मुल्यांवर आपले सादरीकरण उपस्थितांसमोर केले. आपल्या रोजच्या जिवनात आपण या मुल्यांचा कश्याप्रकारे अंतर्भाव करु शकतो यावर देखील चर्चा झाली. मुल्यांचा परिणाम वाढविण्यासाठी त्यांनी गोष्टी, विविध क्रिया, खेळ, प्रयोग इत्यादि साधनांचा वापर केला. मुल्याधारित अध्यात्मिक प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम शिकण्यासाठी व्यवहारिक दृष्टिकोन या कार्यक्रमात ठेवण्यात आला होता.

## चित्तवेधक भेट

5 जानेवारी 2009 रोजी अमेरिकेतील ॲलियंट विद्यापीठ, कॅलीफोर्नियाच्या मानसशास्त्र शाखेच्या विद्यार्थ्यांच्या गटाने बाबूजी मेमोरिअल आश्रम, मणपक्कम, चेन्नईला भेट दिली. सहजमार्ग व त्याचे मानसशास्त्रिय दृष्टिकोनातून वर्तणूकीवर होणारे परिणाम याबाबत अधिक जाणून घेणे हा त्यांच्या सहलीचा ऊद्देश होता. सर्वप्रथम विद्यार्थ्यांना लालाजी मेमोरिअल इंटरनॅशनल स्कूल – कॅब्रीज इंटरनॅशनल स्कूलसह आपल्या आश्रमाची सफर घडविण्यात आली. त्यांच्या अनेक प्रश्नांची उत्तरे त्यांना या सफरीवर घेऊन गेलेल्या अभ्यासींनी दिली. त्यांनी बंधू ए.पी.दुरै यांच्याशी वार्तालाप केला. यावेळी त्यांनी सहजमार्गाबद्दलच्या प्रश्नांना आपल्या, विचारांना प्रवृत्त करणाऱ्या भाषणातून उत्तरे तर दिलीच पण मानसशास्त्राकरिता सहजमार्ग कसा उपयुक्त आहे हे देखील सांगीतले. पाहुण्यांना दुपारचे जेवण दिले गेले. आपल्या आश्रमात त्यांनी खुपच छान वेळ घालविला व येथे जास्त राहण्यास मिळावे ही इच्छा व्यक्त केली.



## एम.बी.ए. विद्यार्थ्यांची मणपक्कम आश्रमास भेट

18 मार्च रोजी आय.एस.बी.आर. स्कूल ऑफ बिझीनेस, तोराईपक्कम चेन्नई येथील विद्यार्थ्यांनी आपल्या मुख्याध्यापिका सत्यप्रिया व अन्य 3 प्राध्यापकांसमवेत बाबूजी मेमोरिअल आश्रम मणपक्कमला भेट दिली. यावेळी आयोजिलेल्या सत्रात बंधू ए. पी. दुरै यांनी आपल्या भाषणात स्वत:च्या व्यवस्थापनासाठी गुरुदेवांची शिकवण, तत्वे व नितिमत्ता, गुरुदेवांची गरज, सहजमार्ग साधना आदि विषयांवर माहिती दिली. विद्यार्थी यामध्ये समरसून गेले होते व नंतर प्रश्नोत्तराच्यावेळी त्यांनी आपल्या शंका विचारल्या. विद्यार्थ्यांकडून मिळणारा प्रतिसाद हा सकारात्मक व वाखाणण्याजोगा होता. मुख्याध्यापिका व अन्य एका प्राध्यापकाने साधनेस सुरुवात केली. यावेळी पाहूण्यांना साधे व रुचकर भोजन देण्यात आले. त्यांना आपली मुलभूत पूस्तके देण्यात आली व गरज पडल्यास भविष्यात पूढील सहाय्याचे आश्वासन देण्यात आले.





## मुल्याधारित अध्यात्मिक प्रशिक्षण कार्यक्रम

तीन दिवसीय मुल्याधारित अध्यात्मिक प्रशिक्षण कार्यक्रम नादार सरस्वती कला वाणिज्य महाविद्यालय, थेनी, तामिळनाडू येथे आयोजित करण्यात आले होते. भगिनी सीता कुंचितपदम व कोइम्बतूरच्या भगिनी सुब्बूलक्ष्मी यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले. यावेळी विद्यार्थ्यांसाठी मुल्याधिष्ठीत जीवन, चारित्र्य व दृष्टिकोन, तणाव व्यवस्थापन, निर्धार व चिकाटी, मुल्ये म्हणजे काय?, नेतृत्वगुण व मानवी जीवनाचे ध्येय आदी विषयांचा समावेश केला गेला. त्याचबरोबर शिक्षकांची भूमिका व तणाव व्यवस्थापन हे दोन विषय बी.एड. च्या विद्यार्थ्यांसाठी घेतले गेले. व्याख्यात्यांसाठी 'शिक्षकांच्या प्रशिक्षकाची भूमिका', 'शिक्षकांची भूमिका', 'मुल्यांचे आचरण कसे करावे?', 'तणाव व्यवस्थापन', 'तणावमुक्ती', 'ध्यान' व 'चारित्र्य निर्माण' हे विषय समाविष्ट होते. जरी या कार्यक्रमाचे आयोजन प्राध्यापक व विद्यार्थ्यांसाठी केले गेले असले तरी एका विशेष सत्रामध्ये त्यांचे वाहनचालक, मदतनीस व अशिक्षकीय कर्मचारी यांना देखील सामावून घेण्यात आले. सुरुवातीस त्यांच्याकडून होणारा असहकार स्पष्ट दिसत होता, परंतु सत्राच्या शेवटी त्यापैकी काहीजण भारावलेले दिसत होते. वाहनचालक व अशिक्षकीय कर्मचाऱ्यांसाठी विषय होते – 'मुलींच्या महाविद्यालयात पुरुष चालकांची भूमिका' व 'जीवनासाठीची मुल्ये'. यावेळी काही कृतीपूर्ण सत्रे व क्रियांचे आयोजन केले होते जो श्रोत्यांसाठी संपूर्णत: नवीन व स्तुत्य असा अनुभव होता.

## मुल्याधारित अध्यात्मिक प्रशिक्षण कार्यक्रम – बंगलोर

28–29 मार्च रोजी दोन दिवसीय शिक्षक विकास कार्यक्रम; बनशंकरी आश्रम बंगलोर येथे संपन्न झाला. यामध्ये 24 अभ्यासींनी भाग घेतला. पहिल्या अर्ध्या दिवशी सर्व सहभागींना मुल्याधारित अध्यात्मिक प्रशिक्षणाचे महत्व विषद केले गेले. बाकीचा संपूर्ण कार्यक्रम मुख्यत: संवादाचे कसब व सहजमार्गाची शिकवणूक यावर केंद्रित केले होते. यामध्ये स्वयंसेवेचे महत्व, स्वयंसेवकांचा योग्य दृष्टिकोन, परिणामकारक सार्वजनिक भाषण इ. विषयांचा समावेश होता. प्रत्येक सहभागीला सार्वजनिक भाषणाच्या अनुभवावर आधारित एक सादरीकरण करण्यास सांगण्यात आले; ज्यामुळे समुहास दिशा मिळाली. याची पूढील पायरी म्हणून प्रत्येकास पूढील वर्षी अश्या किमान 5 कार्यक्रमांच्या आयोजनाची जबाबदारी घेण्यास सांगण्यात आले.

## प्रशिक्षक प्रशिक्षण शिबिर , मलमपुझ्झा



14 आणि 15 मार्चला प्रशिक्षकांसाठी अत्यंत परिणामकारक आणि सखोल असे प्रशिक्षण शिबिर मलमपुझ्झा रिट्रीट केंद्रात आयोजित करण्यात आले. या शिबिरात वेल्लोर, अरणी, पोंडीचेरी, विझ्नुपुरम, होसुर, कृष्णगिरी, धर्मपुरी, हरुर, त्रिची आणि करुर अशा तामिळनाडूमधील खेडोपाडी असलेल्या केंद्रामधून सुमारे 37 प्रशिक्षक सहभागी झाले होते. यावेळी खालील विषय, सत्योदय (Reality at Dawn) , प्रशिक्षक दैनंदिनी (Preceptor's Guide) , व्हिस्पर्स फ्रॉम ब्राइटर वर्ल्ड, या पुस्तकांतील मुद्यांच्या आधारे परस्परांशी संवाद साधून प्रत्यक्ष सादरीकरण करून मांडले गेले.

सहजमार्ग मूलतत्वे आणि साधना – राजेश राठोड
प्रशिक्षकाची भूमिका, जबाबदारी आणि कार्य – एन प्रकाश
व्हिस्पर्स फ्रॉम ब्राइटर वर्ल्ड– एक इश्वरी देणगी – बी जी प्रसन्न कृष्णा
प्रशिक्षकाचे कार्य – स्पष्टीकरण– जी राजावेल
सहजमार्ग कुटुंब – इझिलारासी
समारोपाचे विवेचन – भगिनी कामाक्षी नटराजन

तामिळनाडूचे उत्तरविभागीय प्रमुख बंधू सी राजगोपालन यांनी निरिक्षकाची भूमिका पार पाडली तसेच त्यांच्या अनुभवातून आलेल्या मूल्यवान आणि महत्वपूर्ण सूचना त्यांनी उपस्थितांमध्ये केल्या. आपल्या स्वत:मध्ये होणाऱ्या बदलांमुळे इतर लोकांमध्ये कसे बदल होतात या गोष्टिंवर यात भर देण्यात आला. आपल्यामध्ये आवश्यक बदल घडवून आणण्यासाठी आपण जर आपल्या इच्छाशक्तिचा वापर केला आणि आपले काम जर आपण प्रामाणिकपणे केले तर आपल्या गुरुदेवांना खऱ्या अर्थाने आनंद मिळेल यावर सर्वांचे एकमत झाले.

**भोपाळ केंद्राने** 5 एप्रिलला आयोजित केलेल्या कार्यक्रमात इंदूरच्या आश्रम व्यवस्थापन समितीने भोपाळमधील अभ्यासींना आपले अनुभव सांगितले. दोन वर्षांपूर्वी गुरुदेवांनी मिशनच्या मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यासाठी आश्रम व्यवस्थापन समितीची स्थापना केली होती. या समितीमध्ये विभागीय प्रमुख, केंद्र प्रमुख, आश्रम व्यवस्थापक असे आवश्यक सदस्य मिळून एकूण पाच सदस्यांचा समावेश असतो. आश्रम व्यवस्थापन समिती बद्दल अभ्यासींमध्ये जागरूकता नसल्यामुळे ह्या कार्यक्रमाचा उपयोग समितीचा परिचय करून देणे तसेच समितीला आश्रमातील कामांची विभागणी कशी करावी याची कल्पना देण्यासाठी झाला. बंधू रमाकांत अगरवाल आणि बंधू राजेश रावेरकर यांनी आश्रम व्यवस्थापन समितीचे सदस्य या नात्याने त्यातील कार्याचे त्यांचे अनुभव सांगितले.

## सोलापूर आश्रम



29 मे 2008 रोजी अक्कलकोट रोड, सोलापूर, महाराष्ट्र येथे शहरापासून फक्त पाच किलोमीटर अंतरावर दीड एकर जमीन विकत घेण्यात आली. सुरूवातीस कुंपण घालणे, पाण्याची टाकी बांधणे, पहारेकऱ्यासाठी घर बांधणे अशा प्रकारचे तत्सम प्राथमिक बांधकाम करण्याच्या दृष्टीने 15 एप्रिल 2009 रोजी तेथे भूमिपूजन समारंभ संपन्न झाला. प्रात:काळी 6 वाजता आतूर आणि उत्साहित हृद्‌य आश्रमासाठी असलेल्या या जमिनीवर एकत्र आले. सुमारे साठ अभ्यासींच्या उपस्थितीत साडेसहा वाजता सत्संग झाला.
आश्रमासाठी असलेल्या जमिनीचा विस्तार करण्याच्या हेतूने एकदिलाने जमीन एकसारख्या पातळीत आणणे, वृक्ष लागवड आणि वृक्ष संवर्धन करणे आणि तत्सम आवश्यक कामे करण्याची संधी मिळाल्याने अभ्यासी अत्यंत हर्षित झालेले दिसत होते.

## कर्नाटक दक्षिण विभाग

विभागीय प्रमुख बंधु शरत हेगडे यांच्यासहित तीन जणांच्या प्रशिक्षक गटाने दक्षिण कर्नाटकातील मलनाड भागातील नविन उदयास येणाऱ्या केंद्रातील अभ्यासींना भेट देण्याच्या उद्देशाने यात्रेचा शुभारंभ केला.त्यांनी या यात्रेला 27 मार्च रोजी कानडी नववर्ष उगादीला बंगळूर पासून सुरुवात केली. वाटेत तुमकुर आणि तिप्तुरला ( जेथे आपले आश्रम आहेत) पण भेट दिली. जेव्हा हा गट कडूरला आला तेव्हा तेथे प्रशिक्षकाच्या मदतीशिवाय आणि केवळ गुरुदेवांवर श्रद्धा ठेवून साधना करणाऱ्या एका अभ्यासी कुटुंबाला पाहून ते आश्चर्यचकित झाले. ते अभ्यासी कुटुंबीय 40 ते 70 किलोमीटरचा प्रवास करून सत्संगाला उपस्थित राहातात आणि कधीतरी वैयक्तिक सिटिंग घेतात. त्या कुटुंबातल्या अंध आणि वयस्कर पित्याला त्यांची दृष्टी गेलेली असतानाही जीवनाकडे बघण्याचा योग्य दृष्टिकोन आणि स्वत:हून लहानसे दुकान चालवण्याचा त्यांचा प्रयत्न – हे बघणे हा एक आश्चर्यकारक अनुभव होता.
शिमोग्याला रात्री वस्ती केल्यानंतर या गटाने शिमोगा जिल्ह्यातील घनदाट अश्या मलनाड अरण्याने व्यापलेल्या होसनगाराकडे प्रस्थान केले. बंधु अनंतराम यांच्या कुटुंबीयांनी सिटिंग घेतले. जवळच असलेल्या छोट्याशा हुमचा नामक खेड्यातून आलेल्या एका भगिनीने त्यांना तिच्या गावाला भेट देण्याची विनंती केली. प्रशिक्षकांना तेथे आलेले पाहून तिला अत्यानंद झाला आणि तीन महिन्यांच्या साधनेमुळे तिच्यात कसा बदल झाला यावर तिचे मनोगत व्यक्त केले. तिने गुरुदेवांना पाहण्याची इच्छा व्यक्त केली. त्यानंतर गटाने त्या भागात असलेल्या तीर्थहल्ली आणि कोप्प या छोट्या नगरांना भेट दिली आणि शेवटी संध्याकाळी ते चिकमंगळूरला येवून दाखल झाले.
शेवटच्या दिवसाची सुरुवात चिकमंगळूर येथे सत्संगाने झाली. हसनला अभ्यासींच्या एका छोट्याश्या समुहाला भेटल्यानंतर हा चमू बंगलोर येथे पोहोचला.

श्री रामचंद्र मिशन
एकोज इंडिया
झोनल एकत्रीकरण
मे 2009 खाजगी वितरणासाठी खंड 2 अंक 3


गेल्या दोन महिन्यांमध्ये देशाच्या विविध भागातील केंद्रांमध्ये अनेक प्रशिक्षण वर्ग आणि परीसंवाद घेण्यात आले. प्रत्येक केंद्राची नेमकी गरज ओळखून हे कार्यक्रम झाले ज्यामुळे अभ्यासींना सहजमार्ग समजण्याची तसेच स्वत:ला प्रशिक्षण देण्याची संधी मिळाली.

**रानीखेत** केंद्राने 9 फेब्रुवारीला आयोजित केलेल्या कार्यक्रमात 'गुरुदेवांशी नातेसंबंध' या विषयावर भर देण्यात आला. यात सहभागी झालेल्यांनी स्वत:ची ओळख करून देवून कुठल्या गोष्टींमुळे गुरुदेवांच्या संपर्कात त्यांना राहता येते याविषयी सांगितले. साधना आणि सहजमार्गाची विविध अंगे यावर 20 प्रश्न तयार करून एक खेळ खेळला गेला. या कार्यक्रमामुळे सहजमार्ग समजण्यास अभ्यासींना मदत झाली.



नविन अभ्यासींकरिता 10-11 मार्चला **पिथोरागढ** केंद्र उत्तराखंड येथे दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. अभ्यासींनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास हजेरी लावली. कार्यक्रमाची सुरुवात सहजमार्गाची ओळख, प्रार्थना, ध्यान, शुद्धिकरण प्रक्रिया यांनी झाली. त्यानंतर चारित्र्यनिर्मिती, अभ्यासींची समाजातील भूमिका आणि लोकांना सहजमार्गाविषयी जाणीव उत्पन्न करून देणे याविषयी एक कार्यशाळा घेण्यात आली. दुसऱ्या दिवशी गुरुदेवांची भूमिका, बंधूभाव, सतत स्मरण याविषयी चर्चा झाली. शेवटच्या सत्रात अभ्यासींनी स्वत: या कार्यक्रमातून काय साध्य झाले यावर आत्मपरीक्षण केले. रात्री 9 वाजता रोज होणाऱ्या वैश्विक प्रार्थनेत न चूकता भाग घेण्याचा अभ्यासींनी संकल्प केला.

**काशीपूर** केंद्राने नविन अभ्यासींकरिता 15 फेब्रुवारीला एक प्रशिक्षण वर्ग घेतला. सहजमार्ग साधनेविषयी नविन अभ्यासींच्या मनात जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित केला गेला ज्यात 60 पेक्षा जास्त अभ्यासी सहभागी झाले. या कार्यक्रमात सहजमार्ग साधनेविषयी प्राथमिक माहिती- प्रार्थना, ध्यान, शुद्धिकरण यावरिल भाषणांचा समावेश होता. त्यानंतर प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम झाला. सतत स्मरण याविषयावर झालेल्या दुसऱ्या सभेत सुमारे पन्नास अभ्यासींची उपस्थिती होती. सतत स्मरण याविषयावर झालेल्या भाषणामुळे सहभागी झालेल्यांना 'विचार करणे' आणि 'सतत स्मरण' या दोघांमधला फरक कळून आला. प्रश्नोत्तरांच्या बैठकीमुळे अभ्यासींमध्ये मोकळेपणा येण्यास मदत झाली.





ग्वाल्हेरपासून 70 किलोमीटर अंतरावर असलेल्या **दातिया** केंद्राने 10 अभ्यासींच्या उपस्थितीत 29 मार्चला एक कार्यशाळा घेतली. "केंद्राची वाढ होण्यामध्ये माझी मदत कशी होऊ शकेल"? हे जाणून घेणे हा या शिबिराचा उद्देश होता. सतत स्मरणात राहून मिशनमध्ये स्वयंसेवा केली तर त्यामुळे इतरांमध्येही उत्साह निर्माण होतो ज्याचा फायदा मिशनची वाढ होण्यात होतो असे अनुमान निघाले. मिशनला देणगी देवूनही गुरुदेवांविषयी कृतज्ञता व्यक्त करता येईल.



**शिवपुरी** या ग्वाल्हेर पासून जवळ असलेल्या अजून एका केंद्रात विशेष शिबिर घेण्यात आले ज्यात रविवारच्या सत्संगाला अनियमितपणे येणाऱ्या 23 अभ्यासींनी भाग घेतला. अभ्यासींमध्ये असलेला शिस्तीचा अभाव हे त्यांच्यामध्ये सहजमार्ग साधने विषयी असलेल्या गैरसमजामुळे आहे असे प्रामुख्याने निदर्शनास आले. प्रशिक्षकांनी अभ्यासींशी संवाद साधून त्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली. गुरुदेवांच्या कृपेमुळे 10 अभ्यासींनी साधना पुन्हा सुरु केली.
सहजमार्गाविषयी समज येवून अभ्यासी साधनेमध्ये नियमित व्हावा यासाठी पहिले सहा महिने त्यांच्यावर विशेष लक्ष पुरवणे गरजेचे आहे हे लक्षात आले.

फेब्रुवारीमध्ये गुरुदेवांनी दिलेल्या भेटीनंतर **इंदूर** केंद्राने नविन अभ्यासींसाठी शिबिराचे आयोजन केले. साधनेची विविध अंगे आणि सहजमार्गाची मूलतत्वे या गोष्टी संपूर्णपणे विषद करून या शिबिरामध्ये सांगण्यात आल्या. जुन्या आणि नव्या अभ्यासींमध्ये या निमित्ताने संवाद साधण्यात आला.

15 मार्चला **जयपूर** येथे नविन अभ्यासींकरिता मारवाडी भाषेत अर्ध्या दिवसाच्या शिबिराचे आयोजन केले गेले. अभ्यासींची ओळख करून देण्याच्या कार्यक्रमाने याची सुरुवात झाली. साधना, सफाई, प्रार्थना या विषयांतर्गत प्रत्येक भाषणानंतर प्रश्नोत्तराचा कार्यक्रम झाला. प्रथमच अशा प्रकारचा कार्यक्रम स्थानिक भाषेतून झाला ज्यामुळे आजूबाजूच्या गावातून अभ्यासींनी हजेरी लावली आणि सहजमार्गाची मूलतत्वे साध्या सोप्या भाषेत समजण्यास मदत झाली याचे त्यांनी कौतुक केले. एकंदर 30 अभ्यासींनी या शिबिरात भाग घेतला आणि त्यांनी अशा प्रकारचे शिबिर दर दोन तीन महिन्यांनी व्हावे अशी इच्छा व्यक्त केली.
देवळांचे नगर म्हणून परिचित असलेल्या आंध्र प्रदेश येथील काकीनाडा मधल्या **द्राक्षरामम** या सुदूर केंद्रात आता अभ्यासी संख्या 35 झाली आहे. साधनेची मूलतत्वे आणि दैनंदिन साधना यावर दि 5 मार्च रोजी अभ्यासींमध्ये जागरूकता व समज निर्माण करून त्यांना नियमितपणे सराव करता यावा या दृष्टिने हा एक प्रशिक्षण वर्ग झाला. केंद्रव्यवस्थापक असलेल्या बंधु व्ही शिवराम यांच्या घरी काकीनाडा केंद्रप्रमुख बंधुंनी हा वर्ग संपन्न केला. अशा प्रकारचा हा वर्ग या केंद्रामध्ये पहिल्याप्रथमच झाला. अशी आशा आहे की देवळांचे नगर म्हणून परिचित असलेल्या या भागात सहजमार्ग पद्धतीचे अनुसरण करण्यासाठी एक प्रवेशद्वार उघडले गेले.

**काशीपूर** केंद्राने 9 एप्रिल रोजी आयोजित केलेल्या ओपन हाऊस सभेमध्ये सुमारे 30 अभ्यासींनी भाग घेतला होता. त्यामध्ये मानवी जीवनाच्या अस्तित्वामध्ये वास्तविक ध्येयाची गरज, मनाला नियंत्रित करण्याची गरज, संतुलित जीवनाचे महत्व इ. विषयांवर भाषणे सामाविष्ट होती. भाषणांनंतर एक अनौपचारिक प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम झाला. प्रेक्षकवर्ग विषयानुरुप प्रश्न विचारु शकला यावरुन लक्षात आले कि ओपन हाऊस प्रभावकारी होते. त्यांची उत्तरे आयोजकांनी पूर्ण उत्साहाने दिली.

21 मार्च रोजी सहज मार्ग ध्यानपद्धती या विषयावर परमधाम, **बेंगलोर** येथे ओपन हाऊसचे आयोजन केले होते. नोव्हेंबर 2008 मध्ये झालेल्या उद्घाटनानंतर या आश्रमामध्ये झालेली ही पहिलीच सार्वजनिक सभा होती. सभेच्या एक आठवड्याआधी पाठवलेल्या निमंत्रणाला खूपच चांगला प्रतिसाद मिळून 80 लोकांची उपस्थिती मिळाली. कार्यक्रमाची सुरुवात बंधु सुब्रमनिअन संकरन यांच्या स्वागत भाषणाने झाली ज्यामध्ये ते ध्यानाची गरज यावर बोलले. त्यानंतरच्या एका लघु सत्रामध्ये सहभागींना दहा मिनिटांसाठी डोळे मिटून निस्तब्ध बसण्यास सांगितले. त्यानंतर गुरुदेवांच्या 'अमेरिकेच्या दैनंदिनीमध्ये ध्यान व अध्यात्मिकता' या विषयावरील भाषणाची डीवीडी दाखविण्यात आली. त्यानंतर बऱ्याच प्रश्नांना सामावून घेत बंधु सुब्रमनिअन यांनी सहज मार्ग साधनापद्धतीचे विवरण केले. नंतर सहभागींना लहान लहान गटांमध्ये विभागून अभ्यासींसमवेत परस्पर चर्चा करविली ज्यामध्ये अभ्यासींनी त्यांचे शंकानिरसन केले. कार्यक्रमाअंती बऱ्याच लोकांनी ध्यानाची सुरुवात करण्यामध्ये रुची दर्शविली.



**गुलबर्गा** येथे पूज्य दोड्डप्पा अप्पा इंजिनिअरिंग महाविद्यालयामध्ये 9 मार्च रोजी एका ओपन हाऊसचे आयोजन केले होते. सुमारे 100 विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला. या दिवसाचा विषय होता, 'मननियमनाने स्वयंपरिपूर्णता'. डॉ. गजेंद्र सिंह यांनी या विषयावर भाषण केले व एक सादरीकरण दिले. निशब्द शांततेसह संपूर्ण वातावरणामध्ये एका प्रभावी प्राणाहुतीची जाणीव संपूर्ण वेळ होत होती. यानंतर एक लहान प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम झाला. 5 विद्यार्थ्यांनी अतीव रुची दर्शविली.

12 मार्च रोजी **हुबळी** केंद्राने एस.बी.एम. च्या अधिकारी मंडळामध्ये आयोजित केलेल्या ओपन हाऊसने 'ध्यानाच्या लाभांविषयी' जागरुकता पसरविण्याची संधी दिली. बंधु जी. एस. कामत आणि भगिनी गीता कामत संस्थेविषयी बोलले आणि 'ध्यानाद्वारे तणावमुक्ती' यावर वक्तव्य केले. परिचयपर पुस्तिका विकत घेण्यासाठी सहभागींमध्ये अतिशय उत्साह दिसत होता.

## मुंबई

केंद्रीय रेलमार्ग विद्युत प्रशिक्षण केंद्र मुंबई येथे 7 एप्रिल रोजी सहज मार्ग ध्यानपद्धतीची ओळख करून देण्यासाठी अर्ध्या दिवसाची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

80 प्रशिक्षणार्थी व शिक्षण संस्थेचे इतर कार्यवाह या कार्यक्रमाला उपस्थित होते. बंधु तुषार प्रधान यांनी आपल्या दैनंदिनीमध्ये अध्यात्म आणि ध्यान यांची आवश्यकता आणि महत्व याचे विवरण दिले.

बंधु विश्वास टिल्लु सहज मार्ग साधना, त्याचे विविध पैलू याबद्दल बोलले आणि एखाद्यामध्ये आमुलाग्र बदल घडून आणण्यामध्ये प्राणाहुती कशी मदत करते तेही सांगितले. बंधु श्रीधर थोडा यांनी गुरुदेवांची एक ध्वनिचित्रफीत दाखविली ज्यामध्ये त्यांनी नवीन अभ्यासींसाठी सहज मार्गाबद्दल भाषण दिले आहे. त्यानंतर प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम झाला.

प्रेक्षकवर्ग हा संपूर्ण भारतभरातून आला असल्याने त्यांना स्थानीय प्रशिक्षकांची संपर्क सूची देण्यात आली जेणेकरुन त्यांना जेव्हा इच्छा होईल तेव्हा त्यांच्या सेवेचा लाभ घेता येईल. येत्या महिन्यांमध्ये अशा प्रकारच्या कार्यशाळा नियमितपणे आयोजित केल्या जाव्यात अशी विनंती शिक्षण संस्थेच्या अधिकाऱ्यांनी आम्हांस केली.

## रुरकी

29 मार्च रोजी रुरकी आश्रमामध्ये एका ओपन हाऊस सभेचे आयोजन केले होते. आश्रमाचे फलक शहराच्या महत्वपूर्ण जागांवरती लावले गेले होते, त्याचबरोबर अभ्यासींच्या मित्रमंडळी व परिवारामध्ये निमंत्रणपत्रिका वाटल्या होत्या.

सुमारे 150 जणांनी यात सहभाग घेतला. बंधु ज्ञानेश्वर सरीन व भगिनी छावी यांनी प्रेक्षकांना संबोधीत केले व त्यांच्या शंकांचे निरसन केले. या सत्रानंतर भोजन झाले. या कार्यक्रमामध्ये प्रेक्षक बरेच रमले होते व त्यांनी साधनेची सुरुवात करण्यासाठीच्या महितीमध्ये दाखविलेली रुची पाहून आनंद वाटला. 13 जणांनी साधनेची सुरुवातही केली. काही स्थानीय वृत्तपत्रांनी देखील अतीवृष्टी असूनही झालेल्या या सम्मेलनाची बातमी छापली.

## सोनवडी, महाराष्ट्र.

24 फेब्रुवारी रोजी सोनवडी (औरंगाबाद), महाराष्ट्र येथील अभ्यासींसाठी एक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला होता ज्यामध्ये सोनवडी व लासूर चे सुमारे 40 अभ्यासी सामील झाले होते. सकाळच्या सत्राची सुरुवात बंधु डॉ. गिरगे यांच्या 'सहज मार्गाची मूल तत्वे' व 'प्रार्थना व ध्यान' या विषयांच्या स्पष्टीकरणाने झाली. त्यानंतर बंधु चव्हाण आणि बंधु चिते यांनी अनुक्रमे बंधुभाव आणि राजयोग यावर भाष्य केले. जेवणानंतर सोनवडीच्या स्थानीय रहिवासींसाठी एका ओपन हाऊसचे आयोजन केले होते ज्यामध्ये सहभागींना सहजमार्गाच्या ध्यानपद्धतीचे स्पष्टीकरण दिले. काही अभ्यासींनीदेखील आपले अनुभव सांगितले आणि त्यांच्यामधील दिसलेल्या बदलाबद्दल सांगितले. सर्वांच्या सोयीसाठी हे कार्यक्रम मराठी व हिंदी मध्ये आयोजित केले होते. 'सोनवडी पाठशाळा' या एका स्थानीय शाळेच्या मुलांकरिता मूल्याधारित प्रशिक्षणावर एका तासाचा कार्यक्रमही आयोजित केला होता. सायंकाळी 6:00 वाजताच्या सत्संगानतर कार्यक्रमाचे समापन झाले.

## आंध्र प्रदेश; दक्षिण क्षेत्र.

19 फेब्रुवारी रोजी क्षेत्र1–बी चे क्षेत्रीय प्रमुख बंधु गंगाधर यांच्या समवेत बंधु ए. पी. दुरै यांनी यम्मीगन्नुर आणि करनूल येथे भेट दिली. यम्मीगन्नुर मध्ये बंधु दुरै यांनी सुमारे 40 अभ्यासींसमवेत सत्संग संचालित केला. बंधु गंगाधर यांच्या कौटुंबिक ट्रस्ट द्वारे चालविल्या जात असलेल्या शहरातील एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेला त्यांनी भेट दिली. तेथे छानशा गणवेशामध्ये 900 मुले व NCC च्या मुलींचा एक गट होता. बंधु दुरै यांनी त्यांच्या संचलनाचे व सांघिक क्रियाकलापांचे अवलोकन केले. ते त्यांच्यासमवेत गुरुदेवांच्या विद्यार्थ्यासाठीच्या शिकवणी बद्दल बोलले आणि विद्यार्थ्यांनी त्यांचे भाषण लक्षपूर्वक ऐकले. सर्व विद्यार्थ्यांसाठी मिशनच्या प्रार्थनेने सुरुवात करुन VBSE उपक्रमांची सुरुवात करण्याचे ठरविण्यात आले. नंतर बंधु दुरै यांनी बंधु गंगाधर यांच्या पारंपारिक घरामध्ये स्थापित केलेल्या आणखी एका शाळेला भेट दिली ज्यामध्ये 120 गरीब मुलांना शिक्षण व जेवण मोफत दिले जाते.





करनूल मध्ये त्यांनी सुमारे 180 अभ्यासींसमवेत सत्संग संचालित केला आणि जेवणानंतरच्या एका चर्चात्मक प्रश्नोत्तराच्या कार्यक्रमामध्ये त्यांनी अभ्यासींना प्रश्न विचारले आणि त्यांचे निरसनही केले. सायंकाळच्या सत्संगाला सुमारे 280 अभ्यासी उपस्थित होते. अभ्यासींच्या शंकांना उत्तरे देतानाच एका प्रश्नोत्तराच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली आणि त्याची उत्तरे त्यांनी गुरुदेवांच्या शिकवणींवर आधारुन दिली. प्रशिक्षक/गुरुदेव यांच्याशी नाते, अडचणी व दु:ख यांना जीवनामध्ये कसे पाहावे, स्वयंसेवा, लहान मुलांचे केंद्र, संस्थेची महत्वाची पुस्तके, दर महिन्याच्या पूर्ण दिवसाच्या कार्यक्रमाचे नियोजन इ. सारख्या अनेक विषय यामध्ये हाताळले गेले. या अर्ध्या दिवसाच्या चर्चात्मक कार्यक्रमामध्ये अभ्यासींनी अतिउत्साहाने भाग घेतला.

## अभ्यासी प्रशिक्षण शिबीर, मुंबई

मुंबईच्या अनेक ठिकाणी नवीन अभ्यासींसाठी आयोजित केलेल्या प्रशिक्षण शिबीरांना मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाने अभ्यासींसाठी मूलभूत प्रशिक्षण देण्याची गरज भासली. दोन दिवसांचा एक मूलभूत प्रशिक्षण शिबीराचा कार्यक्रम दि 21–22 फेब्रुवारी 2009 रोजी नवीन पनवेल मधील बाबूजी मेमोरियल आश्रमामध्ये आयोजित केला गेला. मालेगावच्या दोन अभ्यासींसहित 40 अभ्यासींनी यामध्ये भाग घेतला.
गुरुदेवांची दि 18–19 फेब्रुवारी रोजीची 2 दिवसांची भेट अभ्यासींना ताजीतवानी करुन गेली होती आणि 21 फेब्रुवारीच्या कार्यक्रमाची सुरुवात सुखद सत्संगाने झाली.

पहिल्या दिवशी साधनेची मूलभूत तत्वे हा विषय घेण्यात आला. या तत्वांची व्यवस्थित कल्पना सहभागींना व्हावी यासाठी इंग्रजी व हिंदी मध्ये हे कार्यक्रम झाले.

चर्चासत्रात 'जीवनाचे उद्दीष्ट', 'मार्ग व उपाय' आणि 'गुरुदेव' हे विषय चर्चिले गेले. कार्यक्रमाची पूर्वतयारी म्हणून 'सत्योदय' (Reality at Dawn) या पुस्तकाचे वाचन झाले ज्याने हे सत्र अतिशय चर्चात्मक आणि त्याचबरोबर एकाच विचारधारेचे झाले. त्यानंतर 'गुरुदेव, संस्था आणि दैनंदिनी' यावर एक प्रस्तुती झाली. त्यानंतर अभ्यासी स्वयंसेवा, दैनंदिनी लिहिणे आणि दिवसभराच्या शिकवणीचे अवलंबन करण्यासाठी मोकळे होते.

दुसऱ्या दिवसाची सुरुवात सत्संगाने झाली आणि त्यानंतर 'सतत स्मरण', 'ध्येय आणि गतिशील प्रगतीसाठी उपाय' यावर भाषणे झालीत. या कार्यक्रमाची सांगता सहज मार्गाचे दहा नियम यावरील चर्चेने झाली.



## मुलांचे शिबीर, मुंबई

दि. 10 एप्रिल ते 12 एप्रिल मध्ये झालेल्या 'सहज मौज शिबीर' मध्ये 53 मुलांनी भाग घेतला. 9 ते 13 वयोगटातील मुलांसाठी हे शिबीर आयोजित केले गेले होते. गुरुदेवांच्या भेटीमुळे उत्साहित स्वयंसेवकांनी या धमाल परंतु मूल्याधारित कार्यक्रमाचे आयोजन केले.

मुलांना 6 गटांमध्ये विभागले होते: प्रेम, सबुरी, सहिष्णुता, चिकाटी, आनंद आणि धैर्य. रेल्वे समयसारणीवर आधारित एक खेळ खेळला गेला ज्यामध्ये आपल्या ध्येयाप्रत कसे पोहोचावे यावर लक्ष केंद्रीत करण्यास शिकविले गेले. जेवणानंतर लहान मुलांसाठी हवा–घंटी (wind chimes) तयार करुन आपली क्रियाशीलता दाखविण्याची वेळ होती. त्यानी स्वत:च आपले सॅंड्विच तयार करुन खाल्ले. या सत्राची सांगता कथाकथन व खो–खोच्या खेळाने झाली. रात्री जेवणानंतर मुलांना दुर्बीणीमधून ताऱ्यांचे दर्शन करविण्यासाठी छतावर नेण्यात आले.

11 एप्रिल रोजी मुलांसाठी योगाचे सत्र झाले. त्यानंतर अनुभवींच्या सहाय्याने छतावरुन जमिनीवर दोरखंडाने खाली येण्याचा रोमांचक व आनंदमय अनुभव त्यांनी घेतला. जेवणानंतर दोरीवरुन उतरण्याचा अनुभव त्यांनी लिहून काढला. व नंतर 'वस्तु हस्तांतर' हा खेळ खेळण्यात आला. त्यानंतर एका सजीव प्रस्तुतीमधुन जीवनातील मूल्ये दाखविली गेली जी त्यांनी पूर्ण लक्ष देऊन व एकाग्रतेने पाहिली. छतावर प्रसन्नचित्त करणारा एक संगीताचा कार्यक्रम झाला व त्यानंतर एक लहानसा चित्रपटही दाखविण्यात आला.

रविवारी सकाळी मुलांनी 'ग्रीन झोन' क्षेत्राला भेट दिली व नैसर्गीक सौंदर्यास कसे जपावे हे जाणले. इच्छा व गरज या सारख्या मूल्याधारित शिक्षणावर आधारित वैज्ञानिक प्रयोग केले गेले. त्यानंतर मुलांनी प्रश्नमंजुषेमध्ये मनापासून भाग घेतला ज्यामध्ये सामाजिक ज्ञान, विज्ञान, पुराण व सहज मार्गाची मूळ तत्वे या फेऱ्या घेतल्या गेल्या. यानंतर फक्त पालकांसाठी 'पालन' यावर सत्र घेण्यात आले. याचबरोबर हा कार्यक्रम संपुष्टात आला.

श्री रामचंद्र मिशन
एकोज इंडिया

प्रकाश केंद्रे

मे 2009 खाजगी वितरणासाठी खंड 2 अंक 3

## रायचूर आश्रम, कर्नाटक

हा आश्रम (ध्यानमंदीर) पूज्य श्री बाबूजी महाराजांना समर्पित केलेल्या जमिनीवर झालेले खूप जुने बांधकाम आहे. हे शहराच्या मधोमध वसलेले असून त्यामध्ये सुमारे 200 अभ्यासींसाठी सर्व मूलभूत सुविधा आहेत. गुलबर्गाचे आर्किटेक्ट श्री एल.टी. चव्हाण यांच्या मते या वास्तूची समोरील बाजू अध्यात्मिक ध्येय आणि आपला "अनंताकडे" प्रवास दर्शविणारे उंचावलेले दोन हातांचे चित्र रेखाटते.

16 जानेवारी 1970 रोजी पूज्य बाबूजींनी केलेल्या शिलान्यासाने हा आश्रम एका अलौकिक कृपेने भरलेला जाणवतो.

28300 चौ. फूट (195' X 145') एवढ्या जागेवरती हा आश्रम उभारला आहे. याच्या खांबाच्या बैठकीची जागा 140' X 100' एवढी असून ती जशी जशी गरज वाटली व जसे जसे शक्य होत गेले तसे तसे बांधले गेले आहे. काळ्या कणखर दगडांनी याचे बांधकाम केले आहे आणि मजबूत परिघ भिंतीने याचे संरक्षण केले आहे.

कदाचित हा आश्रम 1970 च्या कालावधीतील खूपच मोजक्या मोठ्या जागेपैकी एक असावा. याचा ध्यानकक्ष खूप मोठा (70'X30') आहे. याचे आधार देणारे वासे हे अद्वितीय, तांन्त्रिकदृष्ट्या मजबूत व चिरेबंदी आहे. ध्यानकक्षाच्या एका बाजूला एक व्यासपीठ आहे तर दुसऱ्या बाजूला एक अद्वितीय सज्जा आहे. या आश्रमामध्ये बऱ्याच खोल्या आणि शयनकक्षही आहे. सध्या हे शयनकक्ष बदलून त्याला स्नानगृहासमवेत असे गुरुदेवांचे निवासस्थान करण्यात आले आहे ज्यात केवळ गुरुदेवांच्या उपयोगासाठी एका लहान भोजनगृहाची व्यवस्था आहे.

मोठ्या समारंभासाठी लागणाऱ्या स्वयंपाकासाठी पुरेशी जागा व स्वतंत्र भोजन कक्ष आहे. बंधु–भगिनींसाठी स्वतंत्र शौचालये आहेत.

आश्रमाच्या समोर व बाजूंना हिरवळ आणि बगिचा करुन आश्रम सजविला आहे. पाठीमागे विस्तारासाठी वा बुफे पद्धतीच्या भोजनासाठी पुरेशी जागा आहे.

माणिक प्रभु देवस्थानच्या वाटेवर LVD महाविद्यालयाच्या जवळच रायचूर मध्ये हा आश्रम वसला आहे. हे शहर दळणवळणासाठी खूपच चांगले आहे कारण हे मुंबई–चेन्नै व बेंगलोर–मुंबईच्या रेल्वे मार्गावर आहे. आश्रम, रेल्वे व बस स्थानकापासून 4 कि.मी. अंतरावर असून बऱ्याच शैक्षणिक संस्थांनी वेढलेले आहे.

हे आश्रम बऱ्याच प्रशिक्षण कार्यक्रमासाठी व उत्सवांसाठी उपयोगात येत आहे.







## जम्मू आणि काश्मीर येथे नोंदणीकरण:

हे सांगण्यात आम्हांस अतिशय आनंद होत आहे की, 'त्यांच्या' कृपेने "श्री राम चंद्र मिशन, जम्मू आणि काश्मीर" याचे जम्मू आणि काश्मीर राज्यामध्ये नोंदणीकरण झाले.

## द स्पिरीच्युअल हायरारकी पब्लिकेशन ट्रस्ट :

याचे नोंदणीकरण निम्नलिखित ट्रस्टींसमवेत झाले.:

विजयकुमार भट्टर: मॅनेजिंग ट्रस्टी
राजेश राठोड: सेक्रेटरी
प्रवीण दगडी: कोषागार
संतोष कुमार खांजी: ट्रस्टी
भगिनी उमा प्रभू: ट्रस्टी

SRCM व SMSF या दोन्ही संस्थांनी दि. 31 मार्च 2009 पासून सर्व प्रकाशने थांबविली आहेत. द स्पिरीच्युअल हायरारकी पब्लिकेशन ट्रस्ट ही नवीन संस्था आता SRCM व SMSF यांच्या परवान्याने प्रकाशनाचा सर्व कार्यभार सांभाळेल.

या वार्तापत्राचे सभासद होण्यासाठी कृपया http://www.srcm.org/centers/as/in/newsletter/index.jsp या संकेतस्थळावर संपर्क करावा.
आपल्या सूचना, सल्ले व बातम्या पाठविण्यासाठी in.newsletter@srcm.org या पत्त्यावर ई–मेल करा.

© 2009 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved.
"Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", "SRCM", "Constant Remembrance" and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.
This Newsletter is intended exclusively for the members of SRCM.